(Nagpur) Lokprabha - 14th Aug 2009.





रात्रशाळांमधल्या बोर्डातून पहिल्या येणाऱ्या विद्यार्थ्यांमुळे तात्पुरता प्रकाशझोत पडतो, पण रात्रशाळांचे प्रश्न पुन्हा अंधारात विझून जातात. शैक्षणिक प्रश्नांची उकल एकवेळ होते पण व्यसनाधीनता, अनुपस्थिती आणि आर्थिक कारण या रात्रशाळांच्या समस्यांची काळरात्र संपणार का?

नमिता देशपांडे

# रात्रशाळांसाठी दिवस कधी उजाडणार?



परळच्या मिलिंद नाईट स्कूलमध्ये रात्री साडेआठ वाजता विद्यार्थी आणि शिक्षकांनी भरलेल्या वर्गांमुळे संपूर्ण शाळेलाच सजीवता प्राप्त झालेली भासत होती. एकाग्र चित्ताने शिकत असलेल्या या मुलांकडे बघत असताना लक्षात आले की त्यांच्यापैकी कोणीच गणवेश घातलेला नव्हता. पण त्यांच्या प्रसन्न चेहऱ्याकडे बघून जाणवले की इच्छाशक्ती हाच त्यांचा गणवेश आहे, त्यांना एकत्र बांधून ठेवणारा धागा आहे... हे सर्व विद्यार्थी दिवसभर काम करून रात्री शाळेत येतात. दिवसभराच्या थकव्यापेक्षा आपल्याला शिकायला मिळतय याचेच समाधान त्यांच्या चेहऱ्यावर दिसते आणि बोलण्यातून आपल्या मनात झिरपत जाते. कुठून आणत असतील हे सगळेजण एवढी जिद्द, एवढी कळकळ... या अनुत्तरीत राहणाऱ्या प्रश्नाबरोबरच एक प्रश्न सतत सतावत राहतो... या विद्यार्थ्यांना, त्यांच्या जिद्दीला खतपाणी घालणारी कोणतीच 'सपोर्ट सिस्टीम' आपल्याकडे का नाही?

अशी सिस्टीम नसतानादेखील २५ वर्षे वयाचा प्रमोद सैतवाडकर शिक्षणात तब्बल दहा वर्षांचा खंड पडल्यानंतरही पुन्हा दहावीपासून शाळेत शिकायला जातो. दहावीची परीक्षा पास होतो. आणि परत रात्रमहाविद्यालयात प्रवेश घेतो. दिवसा काम करतो. मिळणाऱ्या तुटपुंज्या पगारात घरासाठी पैसे देतो. पण त्याच्याशी बोलताना परिस्थितीबद्दलची खंत नावाचा काही प्रकार अस्तित्वात आहे की नाही, अशी शंका यावी इतका तळमळीने बोलत असतो. कोणीतरी आपल्याशी बोलत आहे, विचारपूस करत आहे